महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२०-२१/२०२१/ 495 दिनांक : 01 FEB 2021

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महाडीबीटी पोर्टलवरील विविध ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाबाबत..
**(नॉन-आधार बेस्ड ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाविषयी)**
१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना.
३. राज्य अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून महाराष्ट्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्यास सुरुवात झालेली आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मध्ये शिष्यवृत्ती योजनांकरीता पात्र विद्यार्थी ११ वी, १२ वी किंवा डिप्लोमाचे अभ्यासक्रम पूर्ण करत असताना महाडीबीटी पोर्टलवरील ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याकरीता आधारबेस्ड रजिस्ट्रेशन (प्रोफाईल) तयार केलेले असतात. तदनंतर विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये नव्याने विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम अथवा थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश घेतल्यानंतर महाडीबीटी पोर्टलवर विविध शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता जुनेच रजिस्ट्रेशन (युजर नेम व पासवर्ड) वापरुन ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि महाडीबीटी पोर्टलवर जुने रजिस्ट्रेशन असलेले विद्यार्थी नवीन संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर पुन्हा नव्याने रजिस्ट्रेशन करताना नॉन आधार बेस्ड रजिस्ट्रेशन करतात व त्यांचे सिस्टीममध्ये दोन रजिस्ट्रेशन होतात (आधारबेस्ड व नॉनआधारबेस्ड) अशा केसेसमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी नॉन आधारबेस्ड अर्ज सादर केल्यानंतर अर्ज मंजूर झाला तरीही शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त होत नाही तसेच अशा विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर आधारबेस्ड रजिस्ट्रेशन झाले असल्याकारणामुळे त्यांना त्यांच्या नविन अर्जामध्ये आधार क्रमांक अपडेट करता येत नाही व असे नॉन आधारबेस्ड अर्ज आधार क्रमांक अपडेट न केल्यामुळे कालांतराने रद्द होतात व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लाभाचा फायदा मिळत नाही.

त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करतेवेळी संस्थांनी त्यांच्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज तपासणी करतेवेळी नॉन आधार बेस्ड अर्ज स्विकारु नये. ज्या विद्यार्थ्यांकडून असे अर्ज प्राप्त झाले असतील अशा विद्यार्थ्यांकडून नॉन आधार बेस्ड अर्ज सादर करण्याविषयी कारणे तपासून त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. जसे की विद्यार्थ्यांना जून्या लॉगीन आयडी पासवर्डद्वारे अर्ज सादर करण्यास सांगावे, त्यांचा मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक लिंक करुन घेण्यास सांगावे अथवा त्यांना बायोमेट्रीक प्रणाली वापरुन अर्ज सादर करण्यास सांगावे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे